नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १५२ | Issue - 152 | वार शुक्रवार दि. १८ ऑक्टोबर २०२४ | Blow- Friday Date 18 October 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# आचारसंहितेत घेतलेले निर्णय प्रलंबित ठेवण्याचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महायुती सरकारने निवडणुकीच्या तोंडावर विविध महामंडळांवर केलेल्या नियुक्त्या आणि घाईगडबडीत घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीस निवडणूक आयोगाने आक्षेप घेतला आहे. आचारसंहिता लागू असेपर्यंत 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याचा आदेश देतानाच शासन निर्णय निघाले असले पण त्याची अंमलबजावणी झाली नसल्यास ते निर्णय प्रलंबित ठेवावेत, अशी सूचना मुख्य सचिवांना करण्यात आली आहे.

निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वी सरकारने मंत्रिमंडळ बैठकांचा सपाटा लावत समाजातील विविध घटकांसाठी अनेक लोकप्रिय निर्णय घेतले. हे निर्णय घेताना अनेक वेळा विहित प्रक्रिया पूर्ण न होताच निर्णय घेण्यात आले. त्यानंतर विभागांनी प्रस्ताव आणि शासन निर्णयांची प्रक्रिया सुरू केली. त्याचप्रमाणे सरकारने विविध महामंडळांवर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या. काही महामंडळावरील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीचे शासन निर्णय १४ तारखेला काढण्यात आले. अनेक महामंडळांवरील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीचे शासन आदेश निघालेले नाहीत. त्याचप्रमाणे अनेक पदाधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारलेला नाही. सरकारने बुधवारी २७ महामंडळांच्या पदाधिकाऱ्यांच्या




नियुक्त्या केल्या. मात्र आचारसंहिता लागू होईपर्यंत ज्यांनी पदभार स्वीकारलेला नाही त्यांच्या नियुक्तीचे आदेश काढण्यास किंवा पदभार स्वीकारण्यास आयोगाने मज्जाव केला आहे.

राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी आज याबाबत राज्य सरकारला पत्र पाठवून आचारसंहिता जाहीर झाली त्यावेळची परिस्थिती कायम राहील. शासन निर्णय निघाला असला आणि त्यांची अंमलबजावणी सुरू झाली नसेल तर अशा निर्णयांची अंमलबजावणी करता येणार नाही. तसेच मंत्रिमंळात निर्णय झाला असे सांगून आता शासन निर्णय काढणे किंवा त्याची अंमलबजावणी करणे हा आचारसंहिता भंग असून त्यास सबंधित विभागाचे सचिव जबाबदार असतील, असा इशारा दिला आहे. तसेच काही निर्णय किंवा वित्तीय बाबी सबंधित योजनांच्या अंमलबजावणीबाबत केंद्रीय निवडणूक आयोगाची मान्यता घ्यावी लागले असेही या पत्रात नमूद करण्यात आल्याची माहिती आयोगातील उच्चपदस्थ सूत्रांनी दिली.

केंद्रीय निवडणूक आयोगाने मंगळवारी दुपारी साडेतीन वाजता पत्रकार परिषद घेऊन राज्यात निवडणुकीची घोषणा केली. याबाबतची आयोगाकडून सूचना आल्यानंतर राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातून सरकारला पत्र पाठवून दुपारी साडेतीननंतर आचारसंहिता लागणार असल्याने या काळात कोणतेही शासन निर्णय, नियुत्या, निविदा प्रसिद्ध करू नका, असे आदेश दिले होते. राज्य सरकारने मात्र आयोगाच्या या आदेशाकडे दुर्लक्ष करीत मंगळवारी आणि बुधवारी तब्बल १०३ शासन निर्णय निर्गमित केले होते. बुधवारी ही गंभीर बाब आयोगाच्या निदर्शनास आल्यानंतर या संदर्भात चौकशी करून आचारसंहितेचा भंग झाला असल्यास संबंधितांच्या विरोधात कारवाई करण्याचा इशारा राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिला होता. केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य सरकारच्या कारभाराची गंभीर दखल घेत राज्याच्या मुख्य निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून अहवाल मागविल्याचे सांगण्यात आले.

## आयोगाकडून गंभीर दखल

**राज्यातील विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतरही राज्य सरकारने अनेक निर्णय निर्गमित करून तसेच निविदा प्रसिद्ध करून केलेल्या आचारसंहिता भंगाची केंद्रीय निवडणूक आयोगाने गंभीर दखल घेतली असून राज्य सरकारला वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. आयोगाच्या आक्रमक भूमिकेनंतर राज्य सरकारने आचारसंहिता काळात शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेले १०३ शासन निर्णय मागे घेतले असून आठ निविदाही रद्द केल्या आहेत.**

## थोडक्यात

### अदिती तटकरे यांचे फेसबुक अकाऊंट हॅक

अलिबाग : राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांचे फेसबुक अकाऊंट हॅक झाल्याची बाब समोर आली आहे. याबाबत मुंबई पोलीसांच्या सायबर शाखेकडे तक्रार नोंदविण्यात आली आहे. आदिती तटकरे यांनीच समाजमाध्यमांवर या संदर्भातील माहिती दिली.

एखाद्याचे फेसबुक अकाऊंट हॅक करून नंतर मित्र परिवाराला पैसे मागण्याच्या घटना अनेकदा घडतात. सुपरीचीत व्यक्तींचे फोटो वापरून त्यांचे बनावट खाते तयार करण्याचे प्रकार अलिकडच्या काळात सातत्याने समोर येत आहेत. या हॅकींगचा फटका गुरुवारी राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांना बसला.

# नायबसिंह सैनी हरियाणाचे मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चंडीगड : हरियाणाचे नवे मुख्यमंत्री म्हणून नायबसिंह सैनी यांनी गुरुवारी शपथ घेतली. पंचकुला येथे झालेल्या या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे प्रमुख नेते उपस्थित होते. राज्यपाल बंडारु दत्तात्रय यांनी सैनी यांना पद व गोपनियतेची शपथ दिली. दरम्यान, पंचकुला येथील दसरा मैदानावर शपथविधी सोहळ्याच्या निमित्ताने भाजपने जोरदार शक्तिप्रदर्शन केले.

इतर मागासवर्गीय समाजाचे नेते असलेले सैनी हे हरियाणाचे दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले आहेत. वाल्मिकी जयंती दिनी हा सोहळा आयोजित करून भाजपने दलित



समाजात वेगळा संदेश दिल्याचे मानले जाते.

पक्षाचे ज्येष्ठ आमदार अनिल विज तसेच कृष्णलाल पवार, राव नरवीरसिंह जाट नेते महिपाल धांडा, विपुल गोयल, अरविंद शर्मा, श्यामसिंह राणा, रणबिर गंगवा, कुमार बेदी आदींनी या वेळी मंत्री म्हणून शपथ घेतली. तसेच श्रुती चौधरी व आरती सिंह या दोन महिलांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले आहे. श्रुती या राज्यसभा सदस्य किरण चौधरी यांच्या कन्या तर आरती या केंद्रीय मंत्री राव इंद्रजित सिंह यांची कन्या आहे.

राजेश नागर तसेच गौरव गौतम यांनी राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) म्हणून शपथ घेतली. श्रुती चौधरी वगळता इतर सर्वांनी हिंदीत शपथ घेतली. यावेळी केंद्रीय मंत्री अमित शहा, नितीन गडकरी भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा तसेच भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार हेदेखील शपथविधीला हजर होते. तसेच मित्र पक्षांपैकी आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

शपथविधी सोहळ्यापूर्वी सैनी यांनी वाल्मिकी भवन तसेच गुरुद्वारा व पंचकुलातील मानसी देवी मंदिरात पूजा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली नवे सरकार राज्याला प्रगतिपथावर नेईल, असा विश्वास सैनी यांनी व्यक्त केला. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत राज्यात ९० पैकी ४८ जागा जिंकून भाजपने सलग तिसऱ्यांदा येथे सत्ता मिळवली आहे.

# अगरतला-लोकमान्य टिळक टर्मिनस ट्रेनला अपघात



## ८ डब्बे रेल्वे रुळावरुन घसरले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गुवाहाटी : अगरतला - लोकमान्य टिळक एक्सप्रेसचे आठ डब्बे रेल्वे रुळावरुन घसल्याची घटना समोर आली आहे. आसाममधील डिबालोंग स्टेशनवर ही घटना घडली आहे. प्राथमिक माहितीनुसार, या दुर्घटनेत अद्याप कोणीही जीवितहानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही. गुरुवारी दुपारी ३ वाजून ३५ मिनिटांनी हा अपघात झाल्याची माहिती आहे. एक्सप्रेसचे ८ ते १० डब्बे रुळावरुन घसरल्याचं समजतं आहे. एक्सप्रेस रुळावरून घसरण्याचं कारण सध्या समोर आलं नसून याप्रकरणी तपास सुरू आहे. घटनेनंतर रेल्वेचे अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून बचावकार्य सुरू करण्यात आलं. या रेल्वेच्या अपघातानंतर इतर सेवांमध्ये व्यत्यय कमी करण्यासाठी अधिकारी जिथे रेल्वे ट्रॅकवरुन घसरली तो ट्रॅक साफ करण्याचं काम करत आहेत. रेल्वे प्रवक्त्याने दिलेल्या माहितीनुसार, ट्रेनमधील प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात आलं असून त्यांच्या पुढील मदतीसाठी व्यवस्था करण्यात येत आहे. रेल्वेकडून ०३६७४ २६३१२०, ०३६७४ २६३१२६ हेल्पलाइन क्रमांक देण्यात आले आहेत. भारतीय रेल्वेच्या एका प्रवक्त्याने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक्सप्रेसचे डब्बे उतरल्याची माहिती दिली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अगरतला-लोकमान्य टिळक एक्सप्रेस दुपारी जवळपास ३.३५ वाजता आसामच्या डिबालोंग स्टेशनवर रेल्वे रुळावरुन घसरली. रेल्वेच्या प्रवक्त्याने दिलेल्या माहितीनुसार, आसाममधील दिमा हासाओ जिल्ह्यात ही घटना घडली. अपघाताची माहिती मिळाल्यानंतर आसामचे मुख्यमंत्री हिमंत विश्व शर्मा यांनी सोशल मीडिया एक्सवर एक पोस्ट केली आहे. त्यांनी लिहिलंय, १२५२० अगरतला-एलटीटी एक्सप्रेसचे ८ डब्बे आज दुपारी ३ वाजून ५५ मिनिटांनी लुमडिंगजवळ डिबालोंग स्टेशनवर रुळावरुन उतरले. प्रवाशांना या अपघातात कोणतीही दुखापत झाली नाही. सर्व प्रवासी सुखरुप आहेत. आम्ही रेल्वे अधिकाऱ्यांशी समन्वय साधत असून लवकरच मदत गाडी घटनास्थळी पोहोचून मदतकार्य करेल. त्यांनी हेल्पलाईन नंबर देत आपण या अपघातात योग्य ती मदत करत असल्याचं म्हटलं आहे.

# भगवान बुद्धांच्या महान वारशाचा गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पाली भाषेला 'अभिजात' दर्जा मिळाल्याने भगवान बुद्धांच्या महान वारशाचा सन्मान झाला, असे कौतुकोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी काढले. तसेच काँग्रेस सरकारवर टीका करताना, स्वातंत्र्यानंतर भारताच्या सांस्कृतिक वारशाकडे दुर्लक्ष केल्याबद्दलही मोदी यांनी नाराजी व्यक्त केली.

आंतरराष्ट्रीय अभिधम्म दिवसानिमित्त राजधानी दिल्लीत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, मोठ्या संख्येने भिक्षू, काही मुत्सद्दी आणि इतर मान्यवर उपस्थित होते. मोदी यांनी या वेळी सध्याच्या भू-राजकीय परिस्थितीचाही उल्लेख केला. 'बुद्धांकडून शिका, युद्धापासून दूर राहा आणि शांततेचा मार्ग स्वीकारा' असे आवाहन मोदी यांनी संपूर्ण जगाला केले. अलीकडेच केंद्र सरकारने पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याने हा सोहळा आणखीनच खास बनतो, असेही ते म्हणाले.



## 'पाली' भाषेच्या अभिजात दर्जावर पंतप्रधान मोदींचे कौतकोद्गार

प्रत्येक राष्ट्र आपला वारसा आपल्या ओळखीशी जोडत असताना, भारत मात्र खूप मागे राहिला आहे. स्वातंत्र्यापूर्वी आक्रमणकर्त्यांनी भारताची ओळख पुसून टाकण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर गुलाम मानसिकतेने ग्रस्त असलेल्यांनी नंतर देशाला त्याच्या वारशाच्या विरुद्ध दिशेने नेल्याचा आरोप मोदी यांनी केला.

आमच्या सरकारची धोरणे आणि कार्यक्रम भगवान बुद्धांच्या शिकवणींद्वारे मार्गदर्शित आहेत. अस्थिरता आणि असुरक्षिततेने ग्रासलेले जग त्यांच्या शिकवणीतून समस्यांचे निराकरण करू शकतात, असे मोदी म्हणाले. संपूर्ण जग 'युद्ध'मध्ये नाही तर बुद्धामध्ये उपाय शोधू शकते, असेही त्यांनी नमूद केले.

## बुद्धांच्या शिकवणीतील धडे

**आपल्या भाषणात पंतप्रधान मोदी यांनी भगवान बुद्धांच्या शिकवणीतील काही आळीचा उल्लेख केला. 'कलह आणि मतभेद शांततेकडे नेत नाहीत आणि शांततेपेक्षा मोठा आनंद दुसरा नाही. प्रत्येकाचे कल्याण हा भगवान बुद्धांचा संदेश आहे.' बुद्ध हे दोन्ही 'बुद्ध' (चेतना) आणि 'शोध' (संशोधन) यांचे विषय आहेत. आमचे सरकार या क्षेत्रातील शैक्षणिक आणि संशोधन दोन्हींवर भर देत असल्याचे मोदींनी नमूद केले. संयुक्त राष्ट्र संघात त्यांनी एकदा 'जगाला युद्ध नव्हे तर भारताने 'बुद्ध' दिलाह्ह असे म्हटले होते,' अशी आठवणही सांगितली.**

**पाच दिवसांच्या श्रम;निद्रेनंतर देवीच्या मूर्तीची पुन्हा सिंहासनावर प्रतिष्ठापना**

**कोजागिरी पौर्णिमेला देवीचरणी अर्पण केलेल्या फुलांच्या आरास व सजावटीचे भाविकांतून कौतुक**

# कोजागिरी पौर्णिमेला लाखो भाविकांनी घेतले तुळजाभवानीचे दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव /प्रतिनिधी : महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या अश्विन पौर्णिमा म्हणजेच कोजागिरी पौर्णिमा यात्रेसाठी सोलापूर येथील शिवलाड तेली समाजाच्या मानाच्या काठ्यांचे गुरूवारी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास आगमन झाले. दरम्यान नवरात्रानंतर पाच दिवसांच्या श्रमनिद्रेनंतर बुधवारी उत्तररात्री देवीची निद्रा संपताच देवीच्या मूर्तीची पुन्हा सिंहासनावर प्रतिष्ठापना करण्यात आली. नित्योपचार पूजा, आरती नंतर दिवसभर लाखो भाविकांचे देवीदर्शन आणि रात्री तुळजाभवानी देवीची मानाच्या काठ्यांसमवेत छबिना मिरवणूक पार पडली.

परंपरेनुसार तुळजामातेचे माहेर असलेल्या सिंदफळ येथील मुदगुलेश्वर देवस्थान येथे सोलापूरच्या मानाच्या शिवलाड तेली समाजाच्या काठ्या आणि मानकर्यांचा बुधवारी रात्री मुक्काम झाला. गुरूवारी पहाटे मानकर्यांनी तुळजापूर घाटशीळ मार्गे कोजागिरी पौर्णिमा उत्सवासाठी प्रस्थान केले. सकाळी ९ वाजण्याच्या




सुमारास घाळशील मार्गे प्रवेश केलेल्या मानाच्या काठ्यांचे समस्त तुळजापूरकरांनी सडा, रांगोळ्या रेखाटून भक्तिमय वातावरणात स्वागत केले. काठ्यांसोबत आलेल्या मानकरी व भक्तांचे भोपे पुजारी सचिन पाटील, संभाजीराव पाटील, प्रशांत पाटील, शिवराज पाटील यांनी स्वागत करून त्यांच्या निवासस्थानी विश्रामासाठी सोय करण्यात आली होती.

कोजागिरी पौर्णिमेला कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी पायी चालत येणार्या लाखो भाविकांचा जत्था सोलापूर ते तुळजापूर या मार्गावर दिसून येत होता. सकाळची नित्योपचार पूजा, आरती झाल्यानंतर दिवसभर लाखो अबालवृद्ध, स्त्री, पुरुष आदी भाविकांनी जगदंबेच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. पौर्णिमेच्या रात्री जगदंबेच्या छबिन्यात सोलापूर येथून आलेल्या मानाच्या काठ्यांसह मानकरी, भाविक, गोंधळी, आराधी, वासुदेव यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला होता. छत्री, अब्दागिरी, चवर्या दिवटे, पोतांसह निघालेल्या देवीच्या अश्विन पौर्णिमा उत्सवातील छबीना मिरवणूक अवर्णनीय ठरली. हजारो भाविकांनी आपल्या नवस व इच्छापूर्तीसाठी चांदीचा तोडा, पाटल्या, मुकुट देवीचरणी अर्पण करत मनोभावे दर्शन घेतले.

कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या राजे शहाजी महाद्वारासमोर पुणे येथील भाविक आर. आर. किराड यांच्यावतीने हंस पक्षावर विराजमान तुळजाभवानी देवीचे रूप, तुळजाभवानी देवी मंदिराच्या गाभार्यात फुलांचे मयूर, तसेच यज्ञ मंडपाजवळ रंगीबेरंगी फुलांतून महादेव-पार्वती साकारण्यात आली होती. यासाठी विदेशातून फुलांची मागणी करण्यात आली होती. कोजागिरी पौर्णिमेला देवीचरणी अर्पण केलेल्या या फुलांच्या आरास व सजावटीचे भाविकांतून कौतुक होत आहेत.

## संपादकीय....

### आयोगाची चपराक

राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी राज्य सरकारला पत्र पाठवून आचारसंहिता जाहीर झाली त्यावेळची परिस्थिती कायम राहील. शासन निर्णय निघाला असला आणि त्यांची अंमलबजावणी सुरू झाली नसेल तर अशा निर्णयांची अंमलबजावणी करता येणार नाही. महायुती सरकारने निवडणुकीच्या तोंडावर विविध महामंडळांवर केलेल्या नियुक्त्या आणि घाईगडबडीत घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीस निवडणूक आयोगाने आक्षेप घेतला आहे. आचारसंहिता लागू असेपर्यंत ‘जैसे थे’ परिस्थिती ठेवण्याचा आदेश देतानाच शासन निर्णय निघाले असले पण त्याची अंमलबजावणी झाली नसल्यास ते निर्णय प्रलंबित ठेवावेत, अशी सूचना मुख्य सचिवांना करण्यात आली आहे. निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वी सरकारने मंत्रिमंडळ बैठकांचा सपाटा लावत समाजातील विविध घटकांसाठी अनेक लोकप्रिय निर्णय घेतले. हे निर्णय घेताना अनेक वेळा विहित प्रक्रिया पूर्ण न होताच निर्णय घेण्यात आले. त्यानंतर विभागांनी प्रस्ताव आणि शासन निर्णयांची प्रक्रिया सुरू केली. त्याचप्रमाणे सरकारने विविध महामंडळांवर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या. काही महामंडळावरील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीचे शासन निर्णय १४ तारखेला काढण्यात आले. अनेक महामंडळांवरील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीचे शासन आदेश निघालेले नाहीत. त्याचप्रमाणे अनेक पदाधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारलेला नाही. सरकारने बुधवारी २७ महामंडळांच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या. मात्र आचारसंहिता लागू होईपर्यंत ज्यांनी पदभार स्वीकारलेला नाही त्यांच्या नियुक्तीचे आदेश काढण्यास किंवा पदभार स्वीकारण्यास आयोगाने मज्जाव केला आहे.

# भिवंडी तालुक्यात विजयादशमी दिनी धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा

## चळवळ नेहमी तरुण असते, चळवळ कधीही म्हातारी होत नाही : जेष्ठ साहित्यिक ज. वि. पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : चळवळ ही नेहमी तरुण असते, चळवळ कधीच म्हातारी होत नाही त्यामुळे चळवळीचे कार्यकर्ते देखील नेहमी चिर तरुण असतात,त्यांना म्हातारपणा-चे भय नसते असे प्रतिपादन दलित पँथर व आंबेडकरी चळवळीचे जैष्ठ सामाजिक कार्यकर्ते ज .वि .पवार यांनी केले आहे. शनिवारी कवाड येथे भारतीय बौद्ध महासभेच्या भिवंडी शाखेच्या वतीने धम्म चक्र प्रवर्तन दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी पवार बोलत होते.




पुरोगामी महाराष्ट्रात हळू हळू चळवळी लयास चालल्या आ-हेत.आपल्या हक्कासाठी चळवळ जिवंत ठेवणे गरजेचे असून बौद्ध समाजावर अन्याय अत्याचार वाढत होते तेव्हा दलित पँथर संघटना आक्रमक पणे ग्रामीण भागात कार्यरत होऊन समाजा-तील बंधू, भगिणींचे रक्षण करत होती.आता मात्र या चळवळी लयास चालल्या असल्याची खंत देखील पँथर ज .वि .पवार यांनी व्यक्त करत आंबेडकरी समाज गाफील राहिल्यास भविष्यात समाज गुलामगिरीकडे वाटचाल करेल अशी भीती व्यक्त करत त्यामुळे आंबेडकरी समाजाने जागृत रहाणे गरजेचे आहे असा सल्ला देखील पँथर ज . वि पवार यांनी यावेळी दिला.आपल्याला कोणतेही ध्येय साध्य करायचं असेल तर शील पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. असे पाली भाषा अभ्यासिका शिल्पा-ताई सोनावणे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले.

तर ज्येष्ठ आंबेडकर साहित्यिक ज.वी.पवार यांना भारतीय बौद्ध महासभा भिवंडी तालुक्याचे वतीने मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेचे भिवंडी तालुका अध्यक्ष रोहित जाधव असून स्वागताध्यक्ष रंजनाताई भोईर होत्या.तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक बौद्धाचार्य संदीप जाधव यांनी मांडले.

उपस्थित मान्यवरांना सन्मान म्हणून त्यांना भारत सरकारने प्रकाशित केलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन आणि भाषण खंड आणि जनता व बहिष्कृत भारत खंड देण्यात आले.

यावेळी भिवंडी तालुक्यातील आंबेडकरी समाजातील सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थी महिला व नागरिकांचा यावेळी सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमासाठी शेकडो महिला व नागरिक मोठ्या संख्येने उप-स्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश मोहिते, ॲड. श्वेता भालेराव यांनी केले. तर आभार चेतना गायकवाड यांनी मानले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजय गायकवाड, अजय गायकवाड, किशोर गायकवाड, समीर जाधव, विनायक जाधव, शशिकांत जाधव, सचिन भोईर, संजय जाधव, रमण जाधव, वैशाली भोईर, बारकुबाई गायकवाड, अश्विनी चन्ने व तर भारतीय बौद्ध महासभा भिवंडी तालुक्याच्या सभासदांनी विशेष परिश्रम घेतले.

# शंकरराव शरणाप्पा आष्टे प्रशाला भुरीकवठे शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा...

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : अगस्त्या फाउंडेशन आणि टाटा पावर यांच्या संयुक्त विद्यमाने बेंगलोर येथे ऊर्जा मिलान अंतर्गत विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आलेले होते.

त्याठिकाणी एस एस आष्टे प्रशालेतील कु लक्ष्मी वडरे आणि आसमा इनामदार इ ८ वी तील विद्यार्थिनींनी सादर केलेला प्रयोग हा लेसर किरणाच्या साहाय्याने शेती सुरक्षा अथवा बॉर्डर सुरक्षा करता येईल या इनोव्हेटिव्ह संकल्पनेला प्रथम क्रमांकाच पारितोषिक मिळालेले आहे.

आणि त्यांचा प्रयोग पुढे नवी दिल्ली याठिकाणी सादर करण्यासाठी निवडण्यात आला आहे.

लक्ष्मी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे अध्यक्ष उपाध्यक्ष आणि सर्व संचालक, एस एस आष्टे प्रशालेचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याकडून या विद्यार्थ्यांच्या कार्यासाठी कौतुक करण्यात येत आहे.



# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने संगमनेर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शालेय बॅग साहित्य वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

संगमनेर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वती-ने प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे राज्य संघटक संजय प्रदेश सरचिटणीस डॉ विश्वासराव आरोटे यांच्या माध्यमातून संगमनेर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पिंपळ-गाव कोझिंरा गावातील कोकणेवाडी कारवाडी आणि गावठाण जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शालेय बॅग साहित्य वितरण आले या विभागातील राज्याचे महसूल मंत्री नामदार बाळासाहेब थोरात माजी आमदार डॉक्टर सुधीर तांबे आमदार सत्यजित तांबे यांचे विश्वसनीय समर्थक शुभम घुले यांच्या विनंतीवरून या भागातील शाळेंना मदत करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली होती ती आज पूर्ण करण्यात आली यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे उत्तर नगर जिल्हा अध्यक्ष सोमनाथ काळे संगमनेर तालुका अध्यक्ष संजय गोपाळे ग्रामपंचायत पिंपळगाव कोझींरा वतीने मनःपूर्वक आभार यावेळी प्रथम नागरिक सरपंच सोनाली ताई करपे .उपसरपंच संगम आहेर शाळेचे मुख्याध्यापक सोनवणे सर व सर्व शिक्षक वृंद उप-स्थित होते.



याप्रसंगी ग्रामस्थ बादशाह पाटील वाळुंज रोहिदास पाटील मोरे, संदीप करपे दत्तात्रय कडलक संजय खर्डे. बाबासाहेब आहेर व इतर नागरिक उपस्थित होते.

# जि. प. शाळा चांगेफळ येथील विद्यार्थिनींची कुस्ती स्पर्धेत विभाग स्तरावर दमदार कामगिरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

देऊळगाव राजा तालुका प्रतिनिधी/ दिलीप वनवे : पुसद जिल्हा यवतमाळ येथे झालेल्या विभाग स्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा चांगेफळ या शाळेतील विद्यार्थिनींनी कौतुकास्पद कामगिरी केली. *जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये समीक्षा सचिन शेजुळ या विद्यार्थिनीने ४२ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक पटकावला होता व तिची विभागीय स्तरासाठी निवड झाली होती.

आज तिने पुन्हा एकदा आपल्या खेळा ची चुणूक विभाग स्तरावर प्रशिक्षित तालमीत खेळलेल्या मुलीं सोबत खेळताना उत्कृष्ट दाखवून देत उपांत्य फेरीत जात तिसरा क्रमांक पटकावला

अशा प्रकारे ग्रामीण भागा-तील या मुलीनी एक प्रकारे केवळ गावाचे नव्हे तर सिंदखेड राजा तालुक्या चे नाव विभाग स्तरा-वर उंचावले आहे. फ़क्त मुलांचा खेळ म्हणून पाहिल्या जाणाऱ्या कुस्ती खेळात जिद्दीने भाग घेत इतर मुली समोर एक आदर्श सुद्धा निर्माण केला. आपण जिजाऊ च्या लेकी आह-ेत, लढायच आणि जिंकायच हा जणू मंत्र च तिने आज दिला आहे.

तिच्या यशाचे अभिनंदन करत असताना खरोखर तिच्या पालकांचे कौतुक करावे तेवढे कमीच.

# बनावट कागदपत्रांच्या आधारे मतदार म्हणून नोंदणी करण्याचा प्रयत्न

**दैनिक, यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव : बनावट आधारकार्डाच्या आधारे वोटर हेल्पलाईन या मोबाईल ॲपचा वापर करून मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याचा प्रयत्न करणार्या ४० जणांविरोधात सायबर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तुळजापूर तहसीलदारांनी दिलेल्या तक्रार अर्जावरून ही कारवाई करण्यात आली आहे. ऑनलाईन प्रक्रियेचा वापर करून वेगवेगळ्या मोबाईल क्रमांकावरून निवडणूक आयोगाची फसवणूक केली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

**निवडणूक आयोगाची फसवणूक**

तुळजापूर विधानसभा मतदार संघात २ ते १६ ऑक्टोबर या कालावधीत ऑनलाईन पध्दतीचा वापर करून मतदार नोंदणीच्या संख्येत अचानक वाढ झाली. त्यानंतर मोबाईल ॲपच्या माध्यमातून आलेल्या या अर्जांची पडताळणी केली असता, त्यात अनेक अर्जदारांनी जोडलेल्या आधारकार्डचा नामांकन क्रम एकसारखाच आढळून आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्याचबरोबर आधारकार्डवरील फोटो देखील एकसारखेच असून त्यावरील व्यक्तींची नावे मात्र वेगवेगळी असल्याचे समोर आले आहे.




मतदार याद्यांची प्रक्रिया करणार्या केंद्रस्तरीय अधिकार्यांनी या बाबींची पडताळणी केली असता संबंधित व्यक्तींनी नमुद केलेल्या पत्त्यांवर त्यांचे अस्तित्व आढळून आले नसल्याचेही यात म्हटले आहे. त्यामुळे त्यांचा मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याचा अर्ज नामंजूर करावा, अशी शिफारस सहाय्यक मतदार नोंदणी अधिकार्यांकडे पाठविली आहे. बनावट मतदार म्हणून बनावट कागदपत्रांच्या आधारे भारत निवडणूक आयोगाची ४० जणांनी फसवणूक केली आहे. तोतयेगिरी करणार्या या ४० जणांचे नाव, पत्ता आणि ज्या मोबाईल क्रमांकाचा वापर ऑनलाईन नाव नोंदणीसाठी करण्यात आला होता, ते मोबाईल क्रमांकही तक्रारीसोबत जोडण्यात आले असल्याची माहिती तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक अधिकारी अरविंद बोळंगे यांनी दिली आहे.

# स्थलांतरितांचे नागरिकत्व सर्वोच्च न्यायालयात वैध; आसामबाबत कायद्यातील तरतुदीवर शिक्कामोर्तब

नवी दिल्ली : नागरिकत्व कायद्याचा ‘६ अ’ विभाग घटनात्मकदृष्ट्या वैध असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी दिला. या विभागान्वये १ जानेवारी १९६६ ते २५ मार्च १९७१ या काळात आसाममध्ये आलेल्या स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व देण्याची तरतूद आहे. न्यायालयाच्या पाच सदस्यीय खंडपीठाने चार विरुद्ध एक मतांनी ही तरतूद उचलून धरली.

बेकायदा स्थलांतरितांच्या समस्येवर ‘आसाम करार’ हा राजकीय उपाय होता, अशी टिप्पणी सरन्यायाधीशांनी निकालात केली. नागरिकत्व कायद्यामध्ये विभाग ‘६ अ’ची विशेष तरतूद नंतर करण्यात आली. तत्कालीन राजीव गांधी सरकार आणि ‘आसू’ या संघटनेत झालेल्या आसाम करारांतर्गत हा विभाग कायद्यात समाविष्ट झाला होता. नागरिकत्व कायद्यामधील ‘६ अ’ तरतूद वैध ठरवताना सरन्यायाधीश म्हणाले की, राज्याचा लहान आकार आणि परदेशातील नागरिक ओळखण्याची गुंतागुंतीची प्रक्रिया पाहता स्थलांतरितांची संख्या इतर राज्यांच्या तुलनेत अधिक आहे. न्या. एम. एम. सुंदरेश, न्या. मनोज मिश्रा तसेच न्या. सूर्यकांत यांनी सरन्यायाधीशांना सहमती दर्शवली. तर न्या. जे. बी. पारडीवाला यांनी मात्र ‘६ अ’ विभाग वैध नसल्याचे मत नोंदविले.

घटनापीठाचे सदस्य असलेल्या न्या. पारडीवाला यांनी निकालाच्या विरोधात वेगळे मत नोंदविले. या तरतुदीचा बनावट कागदपत्रांद्वारे गैरवापर होण्याची शक्यता अधिक असल्याचे त्यांनी जोडलेल्या टिप्पणीत म्हटले आहे. विभाग ‘६ अ’मधील तरतुदींत वेळेची कुठलीही मर्यादा नाही. विशिष्ट तारखेपर्यंत प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत उल्लेख नाही. त्यामुळे बनावट कागदपत्रांद्वारे चुकीची तारीख दाखवून नागरिकत्व घेतले जाऊ शकेल, असे न्या. पारडीवाला यांचे मत आहे.

# रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन रेणापूर येथे रिफ्रेशर डे व उद्बोधन वर्गाचे आयोजन

**दैनिक, यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रेणापूर /प्रतिनिधी : सुधाकर रणदिवे : रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन, रेणापूर ता . रेणापूर जि.लातूर येथे नवप्रवेशित बी.एड छात्राध्यापकांसाठी दिनांक १६/१०/२०२४ बुधवार रोजी रिफ्रेशर डे व उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रेणुका एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा सौ. मीनल शिवराज मोटेगावकर मॅडम उपस्थित होत्या, कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड चे सिनेट मेंबर




डॉ .अशोक मोटे व कै. एस. घुटे एसीएस कॉलेज, धर्मापूर चे इंग्रजी विषयाचे विभाग प्रमुख डॉ. पांडुरंग मामडगे हे लाभले तर रेणापूर नगर पंचायतीचे मेंबर व सामाजिक कार्यकर्ते श्री. कृष्णा (भाऊ) मोटेगावकर यांची प्रमुख उपस्थित होती

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ.कैलास मोटे सर यांनी केले.सूत्रसंचालन प्रा.शशिकांत चीलरगे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन खटउ समन्वयक प्रा.उमेश रणदिवे यांनी केले.या वेळी बी. एड आणि डी. एल .एड चे सर्व छात्र अध्यापक व पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा.रतन लहाने, प्रा .रमाकांत गायकवाड, प्रा उत्तम दुधभाते, राधिका माने मॅडम, ग्रंथपाल मनीषा लातूरकर मॅडम, चंद्रकांत आडे,दत्ता चादरे ,गणेश राठोड,दिलीप राठोड इ नी सहकार्य केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### सुनील नगरात ॲक्सिस बँकेचे एटीएम फोडले

सोलापूर, (प्रतिनिधी) : एमआयडीसीतील सुनील नगर येथे ॲक्सिस बँकेचे एटीएम मशीन अज्ञात इसमाने तोडफोड करून लॉक तोडून चोरी करण्याचा प्रयत्न केल्याची फिर्याद मनोहर नागेश देसाई (वय-४२,रा.माशाळ वस्ती) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इस्माविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना १६ ऑक्टोबर रोजी घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल गायकवाड हे करीत आहेत.

### एसआरपीएफ कॅम्प जवळ अपघात; एक जण जखमी

सोलापूर, (प्रतिनिधी) : एसआरपीएफ कॅम्प जवळ झालेल्या वाहनाच्या अपघातात एक जण जखमी झाल्याची घटना १५ ऑक्टोंबर रोजी सकाळी सव्वानऊ वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी आश्विनी सुरेश जानराव (वय-३४,रा.एसआरपीएफ कॅम्प गट नंबर १०) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सरकारी वाहन क्रमांक एम एच.१२. व्हीसी.८१४६ यातील चालक याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांचे पती परेड ग्राउंड कडे त्यांच्या ताब्यातील दुचाकी क्रमांक एमएच.१३. डीपी.०२२३ यावरून जात असताना येथील गणपती मंदिर समोर त्यांना धोबी शॉप कडून येणारी वरील क्रमांकाचे सरकारी वाहन रस्त्याचा अंदाज न घेता व हायगयीने चालवून फिर्यादी यांच्या पतीस गंभीर दुखापत होण्यास कारणीभूत झाला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल परदेशी हे करीत आहेत.

### हॅण्डल लॉक केलेली दुचाकी लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : सिव्हिल हॉस्पिटल येथील ए ब्लॉकच्या पार्किंग मध्ये हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३. डीके.०६०२ ही अज्ञात चोरट्याने हॅण्डल लॉक तोडून चोरून नेली आहे. याप्रकरणी प्रसाद चंद्रकांत लांडे (वय-३२,रा.मु.पो.मोहोळ) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल मुलाणी हे करीत आहेत.

### शहर गुन्हे शाखेकडून मोटार सायकल चोरीचे तीन गुन्हे उघडकीस

सोलापूर, (प्रतिनिधी) : सोलापूर शहर गुन्हे शाखेकडून मोटार सायकल चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आणले आहेत. शहर गुन्हे शाखेकडील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीनाथ महाडिक व त्यांचे तपास पथक यांनी शहरातील मोटारसायकल चोरी झालेल्या गुन्ह्याच्या ठिकाणी घटनास्थळी भेट देऊन मिळालेल्या माहितीच्या आधारे मोहमद गौस म.आझम, (वय-३६-,रा.जी.एम. कॉलनी,हास्मानाबाद,बनलागुडा (राज्य-हैद्राबाद) सध्या- क्रांतीनगर झोपडपट्टी समोर मरीआई चौक) व सिद्धू व्यंकय्या चौगुले ( वय-४०, रा.मड्डी वस्ती,वडार गल्ली, सोलापूर या दोघांकडून मोटारसायकली जप्त करून तीन गुन्हे उघडकीस आणले आहेत. यामध्ये सोलापूर शहरातील दोन मोटार सायकल चोरीचे गुन्हे आणि ग्रामीण मधील एक मोटार सायकल चोरीच्या गुन्ह्याचा समावेश आहे.तसेच मोहमद आझम याच्याकडे आणखी एक मोटार सायकल व सिद्धू चौगुले यांच्याकडे एक मोबाईल फोन मिळून आला आहे. अशाप्रकारे शहर गुन्हे शाखेने तीन मोटरसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणून एक लाख वीस हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कामगिरी पोलीस आयुक्त एम.राजकुमार पोलीस उपायुक्त दिपाली काळे,सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीनाथ महाडिक, पोलीस अंमलदार अंकुश भोसले, राजकुमार वाघमारे,शैलेश बुगड, अभिजीत धायगुडे यांनी केली आहे.

# श्री विठ्ठल कारखान्याच्या वतीने दीपावली सणानिमित्त सभासद शेतकऱ्यांना साखर वाटप

## शेतकरी सभासद व ऊस पुरवठदार यांना ३० रु. प्रति किलो याप्रमाणे ५० किलो याप्रमाणे साखर वाटप धोरण जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची चेअरमन अभिजीत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याच्या वतीने दीपावली व गुढीपाडवा सणानिमित्त शेतकरी सभासद यांना सवलतीच्या दरामध्ये पूर्वीप्रमाणेच हे धोरण पुढे चालू ठेवलेले आहे श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या वतीने दीपावली २०२४ सणानिमित्त शेतकरी सभासद व ऊस पुरवठदार यांना३०/ प्रति किलो याप्रमाणे ५० किलो याप्रमाणे साखर वाटपाचे धोरण संचालक मंडळाने जाहीर केले.



दरम्यान या धोरणानुसार दिनांक १४ पासून कारखाना साइटवर जोगेश्वरी मिसळ च्या पाठीमागे पंढरपूर मध्ये के बी पी कॉलेज रोड पंढरपूर शेतकरी सभासद व ऊस पुरवठादार दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत साखर वाटपाची व्यवस्था केलेली आहे

**सध्या बाजारात साखरेची किंमत वाढलेली आहे. मागील दरामध्ये साखर मिळावी हा उद्देश ठेवून ५० किलो साखर ३० रुपये प्रति किलो याप्रमाणे वाटप करण्याचे धोरण ठरवण्यात आले आहे नेमून दिलेल्या साखर वाटप केंद्रातून संचालक मंडळ यांच्या वतीने आव्हान करण्यात आले आहे.**

पंढरपूर येथील साखर वाटप केंद्राचे उद्घाटन ज्येष्ठ संचालक दिनकर ( दाजी) चव्हाण ह. भ. प. चौरे महाराज यांच्या हस्ते करण्यात आले अभिजीत कदम. आर बी जाधव, सेल्स ऑफिसर महेश घाडगे कारखाना साइटवरील साखर केंद्राचे उद्घाटन ह. बुधवार पर्यंत थांबायला. ह. भ. प. अण्णा महाराज भुसनर संचालक सिद्धेश्वर बंडगर यांच्या हस्ते यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी लिगल ऑफिसर कर्मचारी उपस्थित होते.

## विवाहितेला त्रास देऊन घरातून हाकलले; पतीसह सहा जणांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : सासरकडच्या मंडळींनी संगणमत करून विवाहितेला माहेरून सोने व चार ते पाच लाख रुपये घेऊन ये म्हणत शिवीगाळ करत मारहाण केली. त्यानंतर जेवायला न देता शिळे अन्न देऊन शारीरिक व मानसिक त्रास देत घरातून हाकलून दिल्याची फिर्याद सुहाना शाहिद शेख (वय-२०,रा.अंबिका नगर,नई जिंदगी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती शाहीद शारली शेख, सासू मशीदमा शारली शेख, सावत्र सासरे बबलू शेख, दिर शादब शारली शेख, मावस सासू मुमताज इरफन शेख व मावस सासू बानु खाजा मुल्ला (सर्व. रा.अंबिका नगर,नई जिंदगी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पवार हे करीत आहेत.

## आचारसंहिता तक्रार निवारण कक्ष स्थापन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने नागरिकांना व मतदारांना निवडणूक व आचारसंहिता आदीबाबत माहिती मिळावी व तक्रारींचे निवारण व्हावे यासाठी निवडणूक नियंत्रण व समन्वय कक्ष, प्रांत कार्यालय पंढरपूर येथे तक्रार निवारण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. हे तक्रार निवारण केंद्र चोविस तास कार्यरत राहणार असून नागरिकांच्या निवडणुकीसंदर्भात असलेल्या तक्रारीचे या केंद्रामार्फत निवारण करण्यात येणार आहे.

टोल फ्री क्रमांक १८००२३३१२४० हे तक्रार निवारण केंद्राचा टोल फ्री क्रमांक आहे.

**टोल फ्री क्रमांक १८००२३३१२४० कार्यान्वित**

पंढरपूर विधानसभा मतदार संघातील निवडणुकीसंदर्भात नागरिकांनी व मतदारांनी या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. असे आवाहन २५२ पंढपूर विधान सभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

मतदारांनी आपले नांव मतदार यादीत असल्याची खात्री करावी

निवडणूक आयोगाने राज्यातील विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर केला आहे. दि.२० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे, तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीत प्रत्येक मतदारांनी आपला मताधिकार बजावून सहभाग नोंदवावा. मतदानाचा हक्क नोंदवण्यासाठी मतदार यादीत आपले नाव असणे अत्यावश्यक आहे. मतदारांनी आपले नांव मतदार यादीत असल्याची खात्री करावी.

आपले नाव मतदार यादीत आहे किंवा नाही याची खात्री करण्यासाठी https://voters.eci.gov.in/ व या लिंकचा वापर करावा असे आवाहनही २५२ पंढपूर विधान सभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

## दुधनी मराठी शाळेत शाळा व्यवस्थापन समिती बैठक केंद्र शाळेत खेळीमेळीत संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : दि १८-अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी केंद्र शाळा दुधनी येथे दिनांक १७ ऑक्टोबर २०२४ रोजी शाळा व्यवस्थापन समितीचे बैठक शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. गोरखनाथ धोडमनी यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीत संपन्न झाली.

या मराठा प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री श्रीसैल मलगाण सर यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे शब्दसुमनाने स्वागत करुन प्रस्तावना केली. प्रथमत: सभेपुढे आजच्या बैठकीचा अजेंडा, रूपरेषा श्री कोरचगाव सरांनी वाचून दाखवला व मागील सभेतील वृत्तांत वाचला. झालेल्या चांगल्या कामबद्दल सदस्यांनी शाळेचा अभिनंदन केले. यंदाच्या टॅलेंट हंट स्पर्धेतील लोकनृत्य या स्पर्धेत केंद्रस्तरावर प्रथम क्रमांक मिळवून तालुका स्तरापर्यंत मजल गाठल्या कारणाने शाळा व्यवस्थापन समितीतील सर्व सदस्यांनी शिक्षकांचा सत्कार केला... तालुकास्तरापर्यंत लोकनृत्यासाठी विशेष प्रयत्न केल्याने श्रीमती गुंजोटे मॅडम यांचा शाळा व्यवस्थापन समितीकडून सत्कार करण्यात आला. तसेच म्हेत्रे मॅडम यांनी शंभर टक्के इयत्ता पहिली मधील विद्यार्थ्यांना प्रगत करण्यासाठी अथक प्रयत्न केल्याने त्यांचाही सत्कार शाळा व्यवस्थापन समितीकडून करण्यात आला. शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्री. हणमंत कलशेट्टी यांनी देखील शिक्षकांचे कौतुकास्पद



वर्णन केले. समितीचे क्रियाशील सदस्य श्री मीहीदिमिया जिडगे यांनी विद्यार्थी हे या देशाचे संपत्ती असून त्यांच्या शिक्षणाकडे शिक्षकांनी लक्ष देणे व संस्कारक्षम विद्यार्थी घडवणे सगळ्यांचं कर्तव्य आहे असे म्हणाले.शाळेतील उपक्रमशील शिक्षक,तालुका पतसंस्थेचे उपाध्यक्ष श्री.पोमू राठोड सर यांनी शाळा व्यवस्थापन समितीमधील सर्व सदस्य उपस्थित असणे गरजेची आहे, पालकांचा सहभागामुळे विद्यार्थ्यांचे उणीवा दूर करण्यास मदत होईल.तसेच विध्यार्त्यांना यशाच्या शिखरापर्यंत घेऊन जाणे हे प्रत्येक शिक्षकांचे कर्तव्य आहे. असे मत व्यक्त केले. सभेला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. गोरखनाथ धोडमनी, उपाध्यक्ष श्री. हणमंत ढग इत्यादी सदस्य उपस्थित होते. क्षणी श्री. कोरचगाव सर यांनी शेवटी आभार प्रदर्शन केले.सर्व शिक्षक व शिक्षकी,पालक,विध्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

## श्री माणकेश्वर वाचनालयात वाचक प्रेरणा दिन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : भारताचे माजी राष्ट्रपती स्व डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन वैनतेय विद्यालयाचे शिक्षक पवार व निगळ ताई यांच्या शुभहस्ते करण्यात आले.असुन कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाचनालयाच्या उपाध्यक्ष डॉ. मेघा जंगम यांनी केले आपल्या मनोगतात वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार यांनी वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.असुन या प्रसंगी संचालक सुनील चिखले यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ.कलाम यांच्या जीवनावरील आणि बालसाहित्याचे प्रदर्शनही या प्रसंगी लावण्यात आले. सुमारे शंभर विद्यार्थ्यांनी या प्रसंगी समूहवाचन केले. यावेळी इच्छुक बालसभासदांची वर्गणी स्वतः भरण्याचा मानस डॉ मेघा जंगम यांनी व्यक्त केला.याप्रसंगी वाचनालयाचे संचालक दत्ता काका उगावकर, तनवीर राजे, सुनील चिखले, ॲड बाळासाहेब जंगम, प्रकाश बेर्डे ग्रंथपाल नितीन बनसोडे, विद्या बंद्रे, नंदकुमार पुंड, अनिता इस्ते आदी उपस्थित होते. आभार वाचनालयाचे सहचिटणीस राहुल दवते मानले तर सूत्रसंचालन डॉ.मेघा जंगम यांनी केले.




## निफाड शहरात बिबट्याचे दर्शन; नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/ प्रतिनिधी : निफाड शहरातील शंकर नगर परिसरात रात्री एकच्या दरम्यान बिबट्याने अचानक नागरिकांना दर्शन दिले असून परिसरात घाबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे,

सविस्तर माहिती अशी की रात्री एक वाजेच्या दरम्यान टिलू कापसे यांचे प्लॉट कडे व राजू राजोले यांचे घरानजीक असलेल्या तारेच्या कुंपणाला असणाऱ्या गेटवरून बिबट्याने उडी मारून शंकर नगर व आजूबाजूच्या परिसरात पर्णकुटीकडे गेला आहे,यामुळे परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे, सध्या द्राक्ष बागांच्या तसेच इतर शेती पिकांच्या कामांचा वेग वाढला असून त्यामुळे शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर शेतात आपले काम पूर्ण करतात, शेतकरी वर्गाचे आधिच पावसाने मोठे नुकसान केले असून आता हे बिबट्याचे नवीन संकट शेतकरी वर्गापुढे निर्माण झाले आहे, या परिसरात तीन बिबट्यांचा वावर असल्याचे सांगितले जात असून नुकतेच एका बिबट्याला गेटवरून उडी मारताना नागरिकांनी बघितले आहे, निफाड शहरातील नागरिक हे मोठ्या प्रमाणात कोळवाडी रोडवर पाहाटे व सायंकाळच्या वेळी बाहेर फिरण्यासाठी पडतात, या रोडवर मोठ्या प्रमाणात नित्याचीच वर्दळ असून या बिबट्याच्या भीतीने नागरिक घाबरत आहे. नागरिकांना भयमुक्त वातावरणात आपली नित्याची कामे करता यावी यासाठी वन विभागाने परिसरात पिंजरे लावून बिबट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

**व्यापार उद्योग विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांचा पक्षाच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन विशेष गौरव**

**जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न**

# शिवस्वराज्य यात्रेत नागेश फाटे यांचा विशेष सन्मान; शरदचंद्र पवार यांच्या उपस्थितीत पक्षाच्या शिवस्वराज्य यात्रेचा सांगता समारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्रजी पवार पक्षाच्या शिवस्वराज पायाला भिंगरी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष जयंतराव पाटील, खासदार डॉक्टर अमोल कोल्हे. व्यापार उद्योग विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांनी पक्षाची ध्येय धोरणे सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम केले या प्रसंगी पक्षाची बाजू भूमिका ठामपणे



पार पाडली. विधानसभा निवड निवडणुकीतील दिलेली जबाबदारी पार पाडावी म्हणून पक्षाच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन विशेष गौरव करण्यात आला.

**याप्रसंगी नऊ ऑगस्ट २०२४ ते १६ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत २४ दिवस ७३६५ किमी करीत तब्बल ९९ दिवस जिल्ह्यात शिवस्वराज्य यात्रेत सहभागी झाली पवार यांची पक्षाची विचार व भूमिका याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पवार पक्षाच्यावतीने उद्योग व व्यापार विभागाचे राज्यप्रमुख नागेश फाटे गौरवचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आली.**

इस्लामपूर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या शिवस्वराज्य यात्रेचा सांगता समारंभ व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी डॉक्टर अमोल कोल्हे व खासदार धैर्यशील मोहिते पाटील खासदार निलेश लंके सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, युवक प्रदेशाध्यक्ष महबूब शेख, विद्यार्थी संघटना प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, सामाजिक व न्याय विभागाचे राज्य प्रमुख पंडित कांबळे, मा. आ. राजू जावळे, उत्तमराव जानकर, मा. आ. नारायण पाटील, अनिल सावंत, शरदचंद्र पवार पक्षाची सोलापूर रवींद्र पाटील, युवकाचे प्रदेश सरचिटणीस अरुण आजबे, सैनिक सेलचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब जाधव, राज्य कार्यकारणी सदस्य विजय काळे, प्रमुख उपस्थिती प्रमुख उपस्थितीत होते.

नागेश फाटे यांनी आतापर्यंत पक्षाच्या उद्योग व व्यापारी भागात राज्य प्रमुख पदाची जबाबदारी प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत चोखपणे पार पाडत फटे यांनी उद्योग व व्यापार विभाग संपूर्ण राज्यात वाढवण्याचे काम केले आहे त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांचा येतोचित सन्मान करण्यात आला आहे.

## थोडक्यात...

### आचारसंहिता कालावधीत जिल्हा लोकशाही दिन होणार नाही

सोलापूर (जिमाका): अतिरिक्त मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र दि. १५ ऑक्टोबर २०२४ अन्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ चा कार्यक्रम घोषित झाल्याने निवडणुक कार्यक्रमानुसार सोलापूर जिल्हयामध्ये विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येणार आहेत. निवडणुकांची आचार संहिता दि. १५ ऑक्टोबर २०२४ ते २५ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत असल्याने शासनाचे सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक अन्वये आचार संहिता कालावधीत लोकशाही दिनाचे आयोजन करु नये असे नमूद केलेले आहे. त्यामुळे विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ ची आचार संहिता असल्याने या कालावधीमध्ये सोलापूर जिल्हयात दरमहा पहिल्या सोमवारी होणारा जिल्हा लोकशाही दिन (माहे नोव्हेंबर २०२४) मध्ये आयोजित केला जाणार नाही, असे निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी कळविले आहे.

### लघु उद्योगांसाठी ‘संभव हॅकेथॉन २०२४’

सोलापूर : ‘मेझॉन इंडिया’ने आज ‘मेझॉन संभव हॅकेथॉन २०२४’ ही स्पर्धा आयोजित करीत असल्याची घोषणा केली. ही ई-कॉमर्समधील भारतीय लघु व मध्यम व्यवसायांकरीता (एसएमबी) अतिप्रगत तंत्रज्ञान आणि एआय आधारीत नवकल्पना तयार करण्यासाठीची देशव्यापी स्पर्धा आहे. मेझॉनतर्फे भारतात पाचवी वार्षिक शिखर परिषद होत आहे.त्या निमित्ताने आयोजित झालेले हॅकेथॉन हा ‘मेझॉन संभव २०२४’च्या कार्यक्रमाचा एक भाग आहे.भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या वाढीस हातभार लावण्यासाठी देशभरातील नवकल्पकांना यामध्ये आमंत्रित करण्यात आले आहे.

### प्रेमाची नवी व्याख्या सांगणारा ‘नाद’

सोलापूर : एक धडाकेबाज रोमँटिक ॲक्शनपट ’नाद-द हार्ड लव्ह’ हा प्रेमाची नवी व्याख्या सांगणारा मराठी चित्रपट २५ ऑक्टोबरला प्रदर्शित होणार आहे,अशी माहिती अभिनेते किरण गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.निर्माते संजय पगारे. रुपेश दिनकर यांनी शकुंतला क्रिएशन प्रोडक्शन व जिजाऊ क्रिएशन मेकरच्या बॅनरखाली बनवलेला ’नाद-द हार्ड लव्ह’ चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही यासाठी निवडणूक काळात तक्रारींची तात्काळ दखल घ्या

## जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे; बैठकीत अधिकारी कर्मचाऱ्यांना दिले निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




धाराशिव/ सुधाकर रणदिवे : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्याने आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनानुसार जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघात निवडणुकीच्या आदर्श आचारसंहिताचे उल्लंघन होणार नाही यासाठी निवडणूक काळात येणाऱ्या तक्रारींची निवडणुकीत काम करणाऱ्या यंत्रणांनी तात्काळ दखल घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले.

दि.१५ ऑक्टोंबर रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू होताच अधिकारी कार्यालयातील बैठक सभागृह येथे निवडणूक यंत्रणांच्या भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचा आढावा आयोजित बैठकीत घेताना डॉ. ओम्बासे बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,पोलीस अधीक्षक संजय जाधव, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव, उपजिल्हाधिकारी सर्वश्री संतोष भोर, उदयसिंह भोसले, संतोष राऊत, जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, जिल्हा परिषदेचे लेखा व वित्त अधिकारी सचिन इघे जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शेषराव चव्हाण, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, श्याम गोडबोले, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक बारगजे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी पुरुषोत्तम रुक्मे , शिक्षणाधिकारी सुधा साळुंखे, यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. तसेच चारही विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, गट विकास अधिकारी व सर्व नगरपालिका व नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांची व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून उपस्थिती होती.डॉ.ओम्बासे म्हणाले निवडणुकीसाठी लागणारी वाहने तातडीने अधिगृहीत करा सिव्हिल प व कक्ष तात्काळ कार्यान्वित करा स्थिर तपासणी पथके, फिरते तपासणी पथके, व व्हिडिओ पतके तात्काळ गठीत करून सक्रिय करा कर्नाटक राज्य सीमा वरती भागातील विदर्भ गुलबर्गा जिल्ह्याच्या सीमेवर त्वरित पतके गटीत करून सक्रिय करण्यात यावी. जिल्ह्यात विविध ठिकाणी असलेले राजकीय पक्षांचे झेंडे फ्लेक्स बॅनर तात्काळ काढण्यात यावे. उद्घाटन व भूमिपूजन दर्शवणारी फटके झाकून ठेवण्यात यावे निवडणूक निर्णय अधिकारी, गटविकास अधिकारी, व मुख्याधिकारी यांनी २४ तासाच्या आत केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करावा अर्ज १२ ड नुसार मतदान करणाऱ्या मतदारांची यादी तयार करून त्यांचे मतदानाचे अर्ज भरून घ्यावे. यावेळी टपाल व गृह मतदान मोठ्या प्रमाणात होणार असल्यामुळे हे मतदान व्यवस्थितपणे होईल याची दक्षता घेण्याच्या सूचना डॉ.ओम्बासे

यांनी यावेळी दिल्या.सी- व्हिजील कक्षात येणाऱ्या तक्रारी ९० मिनिटाच्या आत निकाली काढण्यात याव्यात असे सांगून डॉ. ओम्बासे म्हणाले, अधिकारी स्तरावर निवडणूक विषयक प्रशिक्षणाची तारीख व वेळ निश्चित करण्यात यावी. निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावर एक खिडकी योजनेतून उमेदवार व संबंधित राजकीय पक्षांना निवडणूक विषयक बाबींचा परवानगी देण्याची व्यवस्था करावी असे ते म्हणाले. पोलीस अधीक्षक जाधव यावेळी म्हणाले निवडणूक काळात पुरेसा पोलीस बंदोबस्त राहणार आहे.

**विविध पथके गठीत करण्यात येणार आहेत. आंतरराज्य व जिल्ह्याच्या सीमेवर २४ तास पोलीस पथके आवश्यक त्या ठिकाणी तैनात राहणार आहेत. निवडणूक काळात प्रतिबंधात्मक उपाययोजना तात्काळ करण्यात येतील.असेही त्यांनी सांगितले. जाधव म्हणाले विभाग स्तरावर नोडल अधिकाऱ्यांचे जिल्हास्तरावर निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे निवडणूक विषयक प्रशिक्षण घेण्यात आले आहे. आता विधानसभा क्षेत्रातील अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे दुसरी प्रशिक्षण घेण्यात येणार आहे. भरारी तपासणी पतके, स्थिर तपासणी पतके, व व्हिडिओ पतके, तात्काळ कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.**

# भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील विकासकामांचे आमदार मोरे यांच्या हस्ते उद्घाटन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी/प्रतिनिधी : भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील विविध गावातील विकासकामांचे आमदार शांताराम मोरे यांच्या हस्ते उत्साहात उद्घाटन करण्यात आले..

पडघ्याजवळील गृप ग्रामपंचायत कुंरूद हद्दीतील वाहुली, आंबेडकर नगर, कुंरूद, वाफाळे, दळेपाडा येथील आमदार शांताराम मोरे यांच्या प्रयत्नाने आमदार व विविध मंजूर निधीतून बनविण्यात आलेले सिमेंट कॉक्रींट, पेव्हर ब्लॉक रस्ते, विधीघाट, समाजमंदिर, स्मशानभूमी कांमाचे तसेच गृप ग्रामपंचायत राहुर हद्दीतील तुळशी येथील नदीवरील ब्रीज, रस्त्यांचे उद्धाटन आमदार शांताराम मोरे, ठाणे जिल्हा मजुर फेडरेशनचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक पंडीत पाटील यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले तर संपुर्ण खराब झालेला व नवीन रस्ता बनवण्यासाठी नागरिकांची सातत्याने मागणी होत असलेल्या पडघा पाच्छापुर रस्त्यावरील पडघा - शिरगांव रस्त्यासाठी २५ कोटी व शिरगांव - कासणे रस्त्यासाठी २५ कोटी रूपयांचा निधी आमदार मोरे यांनी मंजूर केल्याने या रस्त्याच्या कामाचे भुमीपुजन आमदार शांताराम मोरे, पंडीत पाटील यांच्या हस्ते शिरगांव चौकात श्रीफळ वाढवुन करण्यात आले.

यावेळी भाजयुमो माजी जिल्हाध्यक्ष श्रीकांत गायकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सचीन पाटील, पंचायत समितीचे माजी उपसभापती गुरूनाथ जाधव सरपंच दीपाली केदार, योगीता जाधव उपसरपंच कल्पना जरे उपतालुकाप्रमुख व ग्रामपंचायत सदस्य योगेश पाटील, युवा पदाधिकारी अजय मोरे, कुंरूद सेवा सोसायटीचे संचालक भगवान सांबरे, टीडीसी बँकेचे माजी संचालक विकास पाटील, उपतालुकाप्रमुख भगवान भोईर, ग्रामपंचायत सदस्य भाई पाटील, जान्हवी पाटील, संदीप काठोळे, विनोद पाटील, रविंद्र विशे समाजसेवक दीलीप केदार जगदीश पाटील, योगेश जाधव, अभिनव पाटील, सुभाष पाटील उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास पाटील यांनी केले.

# राज्य उत्पादन शुल्क, विभागाकडुन सोलापुरात महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या आंतरराज्य समन्वय बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : मा. निवडणुक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा २०२४ चा निवडणुक कार्यक्रम जाहिर केला असुन या अंतर्गत दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. त्याअनुषंगाने सोलापुर जिल्हयास कर्नाटक राज्याची सीमा लगत असल्याने दिनांक १७ ऑक्टोबर २०२४ रोजी सोलापुर येथे राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाचे विभागीय उप-आयुक्त श्री. सागर धोमकर यांचे निर्देशानुसार सोलापुर जिल्हयाच्या अधीक्षक श्रीमती भाग्यश्री पं. जाधव, राज्य उत्पादन शुल्क, सोलापुर यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय उप-आयुक्त सागर धोमकर यांचे अध्यक्षतेखाली कर्नाटक राज्यातील विजयपुरा जिल्हयाचे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे उपायुक्त डॉ. संगनगौडा होसळ्ळी व कलबुर्गी जिल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक हनमंतराय वज्रमड्डी, उपअधीक्षक दोडाप्पा हेबळे तसेच सोलापुर जिल्हयातील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे उप अधीक्षक एस. आर. पाटील, निरीक्षक जे.एन. पाटील, इतर कर्मचारी यांची सोलापुर नियोजन भवन सभागृहात आंतरराज्य समन्वय बैठक पार पडली.

या बैठकीमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय उप आयुक्त, श्री. सागर धोमकर यांनी आगामी होणा-या विधानसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने सर्व अधिकारी व कर्मचारी यांचेशी सविस्तर चर्चा करुन सोलापुर जिल्हयास कर्नाटक राज्याची सीमा लगत असल्याने निवडणुक कालावधीमध्ये कर्नाटक राज्यातुन कोणत्याही प्रकारे अवैध दारुची वाहतुक, विक्री, निर्मिती होणार नाही याबाबत प्रतिबंध करण्याकरीता दोन्ही राज्यातील उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांनी परस्परांत समन्वय ठेवुन दोन्ही राज्यात सीमावर्ती भागातील चेकपोस्ट द्वारे आंतरराज्य माल वाहतुक व प्रवासी वाहतुक करणाऱ्या सर्व वाहनांची अत्यंत सुक्ष्मपणे तपासणी करावी व कसून चौकशी करुन एकाहो वाहनातुन अवैध दारु तस्करी होणार नाही याची खबरदारी घ्यावी. सीमावर्ती भागामध्ये दोन्ही राज्यांच्या राज्य उत्पादन शुल्क विभागांनी अवैध दारु तस्करी करणाऱ्याच्या माहितीचे संकलन करुन परस्परांना द्यावी. सीमावर्ती भागामध्ये सामुहिक मोहिमा राबविणे, अवैध दारु साठवणुक ठिकाणे व हातभट्टी ठिकाणांची गोपनिय माहिती काढुन त्यावर कारवाई करणे, सीमेवरील दारु दुकानांच्या दारु विक्री व्यवहारांवर कठोर नियंत्रन ठेवावे अशा सुचना विभागीय उप आयुक्त, श्री. सागर धोमकर यांनी दिल्या आहेत. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क, सोलापुर यांनी अवैध मद्य विक्री/वाहतूक विरोधात कर्नाटक राज्याच्या सीमेवर सीमा तपासणी नाका उभारण्यात येणार असुन अवैध मद्य विक्री/वाहतूक विरोधात विविध पथके नियुक्त केले आहेत, सदर पथके दिवसा तसेच रात्री देखील कार्यरत आहेत. अवैध मद्यविक्री, अवैध धंदे व वाहतूकी विरोधात कारवाई यापुढेही चालु राहणार असून, अवैध मद्याबाबत माहिती असल्यास टोल फ्री १८००२३३९९९९ क्रमांक अथवा व्हॉटस ॲप क्रमांक ८४२२००११३३ या कार्यालयास माहिती दिल्यास माहिती देणाऱ्याचे नांव गुप्त ठेवले जाईल असे अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापुर श्रीमती. भाग्यश्री पं. जाधव, यांनी सांगुन अवैध मद्याबाबतची माहिती कळविण्याचे आवाहन केले आहे.

## उल्हासनगरमध्ये रंगले आंबेडकरी साहित्य संमेलन

### अनिल भालेराव यांचे प्रतिपादन

# ...तर स्वाभिमानी साहित्यिकच साहित्याच्या माध्यमातून सर्वसामान्याचे प्रश्न मांडू शकतात


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : उल्हासनगरमध्ये थे साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. या साहित्य संमेलनाचे उद्धाटन डॉ. संजय अपरांती यांनी केले. ते यावेळी म्हणाले, आंबेडकरी साहित्य संमेलन म्हणजे एक प्रकारे संसदीय अधिवेशन असून येणारा प्रत्येक साहित्यिक हा आमदार खासदारच आहे. त्यामुळे चळवळ जिवंत राहते. या साहित्य संमेलनाचे मुख्य संयोजक बी अनिल तथा अनिल भालेराव यांनी आंबेडकरी साहित्य संमेलनाची भूमिका मांडताना ते म्हणाले, स्वबळावर आंबेडकरी साहित्य घेतले तर चळवळ कोणाची बटीक होत नाही. आंबेडकरी विचार रुजवायचे असेल तर स्वाभिमानी साहित्यिकच साहित्याच्या माध्यमातून सर्वसामान्याचे प्रश्न मांडू शकतात. या साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष प्रा. आनंद देवडेकर यांनी पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल आनंद व्यक्त केला. ते पुढे म्हणाले शासन कोणतेही पक्षाची असो आपण त्यांचे निरपेक्ष भावनेने पाली भाषेला अभिजात दर्जा दिल्याबद्दल अभिनंदन केले पाहिजे. आंबेडकरी साहित्य हेच बौद्ध साहित्य असल्याचे त्यांनीप्रतिपादन केले. या साहित्य संमेलनात राज्यघटना, आंबेडकर साहित्याचे योगदान या विषयांवर प्रा. दफेदार अकिफ, प्रा. प्रेमरत्न चौकेकर,प्रा. प्रज्ञाकिरण वाघमारे, डॉ. आशा ब्राह्मणेयांनी आपले विचार मांडले. तर कवी संमेलनाचे अध्यक्षपद प्रा. उत्तम भगत यांनी भूषविले. महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातून आलेल्या कवींनी आपल्या कवितेच्या माध्यमातून जनसामान्यांची भावना मांडली.उदघाटन सत्राचे सूत्रसंचालन प्रा. अनिल कवठेकर यांनी केले.तर कथकथान संवादाचे सूत्रसंचालन प्रिती माने यांनी केले. तर कवी संमेलनाचे सूत्रसंचालन मिलिंद जाधव यांनी केले. सदर आंबेडकरी साहित्य संमेलन यशस्वी करण्यासाठी सुनील दुपटे, शामराव सोमकुवर यांनी परिश्रम घेतले.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयात डॉ ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट /प्रतिनिधी : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील वांग्मय मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी देशाचे भूतपूर्व राष्ट्रपती डॉ एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त उत्स्फूर्तपणे वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम आयोजित केला. यावेळी ग्रंथालयातील ग्रंथांचे पूजन करण्यात आले.

### विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे आयोजित केला कार्यक्रम

महाविद्यालयाच्या ग्रंथालयाच्या प्रांगणात विद्यार्थ्यांच्या वतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात डॉ एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. ग्रंथ पूजन देखील करण्यात आले. यावेळी रा से यो कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार, प्रा भीम सोनकांबळे, प्रा मनीषा शिंदे, प्रा डॉ शितल झिंगाडे, प्रा शितल फुटाणे, प्रा मधुबाला लोणारी, प्रा विद्याश्री वाले, प्रा हर्षदा गायकवाड, विठ्ठल यरगल, महेश जोगदे आदी उपस्थित होते.

खास विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या या उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विद्यमान आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, जुनिअर महाविद्यालय विज्ञान विभाग प्रमुख पुनम कोकळगी सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, समन्वयक मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी व दिगंबर जगताप यांनी अभिनंदन केले.

### विद्यार्थ्यांनी घेतली ग्रंथ वाचन करण्याची शपथ...

**माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथ वाचन संस्कृती लुप्त झाली आहे, म्हणून विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील दुर्मिळ तसेच नवीन वांग्मयीन व ऐतिहासिक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय ग्रंथ वाचन करण्याची शपथ घेतली. महाविद्यालयाच्या वतीने दुर्मिळ ग्रंथ विद्यार्थ्यांना वाचन करण्यासाठी दिले जातील असे यावेळी अभिवचन देण्यात आले.**